# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/10/2023 (मंगळवार) दुपार

---

## जनावरे चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा करंभाड येथे दिनांक १५/१०/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक १६/१०/२०२३ चे ०४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश रामदास कुकरे, वय ५० वर्ष, रा. करंभाड ता. पारशिवनी याच्या पत्नीने त्याचे घरासमोरील उघडया कोठयात तिन बकरे व १८ बकऱ्या चारापाणी करून बांधुन ठेवल्या होत्या यातील फिर्यादीचे पत्नी हीने पहाटे उघडया कोठयात आत जाउन पाहिले असता तिला कोठयामध्ये लांब कानाचा लाल रंगाचा ११ महिन्याचा बोकुड किंमती १००००/– रू चा व एक मोठी गाभन असलेली अडिच वर्षाची काळया रंगाची मोठे कान असलेली बकरी किंमती ८०००/– रू व एक पांढऱ्या रंगाची एक वर्षाची गाभन व मोठे कान असलेली बकरी ७०००/– रू किंमत असलेली असे एक बांकुड व २ गाभन बकऱ्या तिन्ही किंमती २५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ढबाले ब. नं. मो. क्र. ९९२३६२१२७५ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत तारसा जॉईट ता. मौदा जि. नागपूर येथे दिनांक १४/१०/२०२३ चे १७.३० वा. ते दिनांक १६/१०/२०२३ चे ०७.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– प्रशांत विनायकराव काटकर, वय २८ वर्ष, रा. तारसा जॉईट, ता. मौदा, जि. नागपुर हे त्यांचे परीवारासह भंडारा येथे डॉ. साठवणे यांच्याकडे उपचारा करीता गेले व उपचार करून ते त्यांची सासुरवाडी गिरोला जाक येथे जावुन मुक्काम केले दिनांक १६/१०/२०२३ ला घरी परत आले तेव्हा त्यांना त्याच्या किराणा दुकानाचे दार उघडे दिसले घरातील आलमारीला चाबी लागुन असलेली दिसली त्यांनी संपुर्ण पाहणी केली असता घराच्या स्लॅपवरून कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून बेडरूम मध्ये ठेवलेल्या आलमारीतील एक ताईत अर्धा ग्रॅम किंमती ५००/– रू. दोन ताईत दोन ग्रॅम किंमती १५००/– रू. इतर सोन्याचे दागीने एकुण किंमती ८५,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून फिर्यादी घरी नसतांना चोरून घेवून गेलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५४, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भगवान चांदेवार, ब. नं. ४४२ पोस्टे. मौदा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर